महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,
आकार प्रिमायसेस , दुसरा मजला, एम.एच.बी. कॉलनी,
शास्त्रीनगर, येरवडा, पुणे ४११ ००६
दुरध्वनी क्र. ०२०-२६०५१८१४/ २६१२७८८०  ईमेल dvintobcsbcwpune@gmail.com

जा.क्र. इमाबकसं/परदेशी शिष्यवृत्ती/मुदत वाढ/२०२६-२७/ 3607  दि. १९/०६/२०२६

प्रति,
प्रकल्प व्यवस्थापक,
एस.एस.डी.आय.टी. सोल्युशन,
नाशिक.

विषय :- सन २०२६-२७ साठी परदेश शिष्यवृत्ती पोर्टल जाहिरात मुतदवाढकारणांन्वये कार्यरत ठेवणेबाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र क्र. शिवृत्ती २०२६/प्र.क्र.१५/शिक्षण-२ दि.२० मे २०२६
२. शासन पत्र क्र. शिवृत्ती २०२६/प्र.क्र.१५/शिक्षण-२ दि.१९ जून २०२६

वरील विषयी कळविण्यात येते की, दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सचिव कार्यालय (ओबीबीडब्ल्यू विभाग, मुंबई), इतर मागास बहुजन कल्याण, संचालनालय पुणे, आणि श्री हेमंत साळुंखे सर यांच्या उपस्थितीत झालेली व्हिडिओ कॉन्फरन्स (VC) चर्चेनुसार, विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी हायब्रीड दृष्टिकोनाने (ऑनलाइन + ऑफलाइन मोड्यूल) परदेशी शिष्यवृत्ती पोर्टल सुरू करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या संदर्भात, आपल्या कडुन विभागासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता पोर्टल सुरू करण्यास (गो- लाइव्ह) पुष्टी मिळाली आहे.

त्यानुसार परदेश शिष्यवृत्ती सन २०२६-२७ करिता तयार करण्यात आलेले ऑनलाइन पोर्टल सुरू (GO LIVE) करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर पोर्टल दिनांक २२.०४.२०२६ पासून ते दिनांक २२.०६.२०२६ कार्यान्वित कराण्यात आले आहे.

परंतु बहुतांश विद्यापीठातील पदवीधर मुलांना निकाल दि. २२.०६.२०२६ तारखेच्या अगोदर लात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता १५ दिवसाची म्हणजेच दि. ०८.०७.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तथापि, सदर पोर्टल दि.०८.०७.२०२६ पर्यंत कार्यान्वित करावे.

> अर्जदारांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात याव्यातः

- अर्ज भरताना सर्व माहिती अचूक व पूर्ण भरावी.
- आवश्यक कागदपत्रे निर्धारित स्वरूपात अपलोड करावीत.
- अर्ज सादर करण्यापूर्वी सर्व तपशील काळजीपूर्वक तपासून घ्यावेत.

> अडचणी नोंदविण्याबाबतः

- अर्ज भरताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण आल्यास आपल्या स्तरावरुन प्राप्त तक्रारींचे त्वरित निराकरण करावे, एकाही अर्जदारास अर्ज भरताना तांत्रिक समस्या / अडचणी येणार नाहीत याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**सोनाली मुळे ( भा. प्र.से.)**
**संचालक**
**इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-६**